# DHARAVI COMPILED MEDIA REPORT

24 Feb, 2025

## Total Mention 2

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
|---|---|---|---|---|
| 2 | N/A | N/A | 2 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
|---|---|---|---|---|
| N/A | N/A | N/A | N/A | N/A |

| Online |
|---|
| N/A |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
|---|---|---|---|---|
| 1. | Punyanagari | Action taken on two houses that are obstructing | Mumbai | 3 |
| 2. | Pudhari | Action on two houses for Sion-Dharavi bridge | Mumbai | 3 |

Punyanagari • 25 Feb • Dharavi

## Action taken on two houses that are obstructing

| 3 • PG | 130 • Sqcm | 71666 • AVE | 72.24K • Cir | Middle Right |
|---|---|---|---|---|

Mumbai

# अडथळा ठरणाऱ्या दोन घरांवर कारवाई



। धारावी : धारावी-सायन उड्डाणपुलाच्या कामात अडसर ठरणाऱ्या बांधकामावर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला असून, सोमवारी सकाळी उड्डाणपुलालगत रेल्वे प्रशासनाच्या हद्दीत असलेल्या दोन पक्क्या घरांवर मनपा जी उत्तर विभागाने कारवाईचा बुलडोझर फिरवला. संबंधित प्रशासनाच्या धडक कारवाईमुळे उड्डाणपुलालगत राहणाऱ्या रहिवाशांत चिंतेची लाट पसरली आहे.

येत्या काही दिवसांत उड्डाणपुलालगतच्या एका शाळेच्या वाढीव बांधकामासह मच्छी मार्केटच्या ५५ गाळ्यांवर कारवाई होण्याची शक्यता आहे, त्यामुळे गाळेधारकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. धारावी-सायन उड्डाणपुलाच्या संरक्षक भितीपासून काही फुटांवर ही पक्की घरे बऱ्याच वर्षापासून उभी होती. पुलाच्या कामात ही घरे अडथळा ठरत असल्याने ही कारवाई करण्यात आली.

निर्माणाधीन उड्डाणपुलाच्या आराखड्यात या जागेत उड्डाणपुलाचा जिना येत असल्याने या घरांवर कारवाई करण्यात आल्याचे मनपा अधिकाऱ्याने सांगितले. या कारवाईमुळे मच्छी विक्रेते, गाळेधारकांत चांगलीच खळबळ माजली आहे.

येणाऱ्या दोन-चार दिवसांत लक्ष्मीबाग मच्छी मार्केटमधील पात्र गाळेधारकांनी आपल्या पुनर्वसनाबाबत लवकरच निर्णय घ्यावा, अन्यथा मनपाची कारवाई अटळ असल्याची चर्चा बाजारात रंगली आहे.

The Municipal North Division demolished two houses near the Dharavi-Sion flyover on Monday, citing obstruction to bridge construction. This has raised concerns among local residents and vendors, with potential future action affecting the fish market. Market holders are urged to make rehabilitation decisions within days to avoid further municipal action.

Pudhari • 25 Feb • Dharavi

## Action on two houses for Sion-Dharavi bridge

| 3 • PG | 124 • Sqcm | 111775 • AVE | 347.1K • Cir | Bottom Center |
|---|---|---|---|---|

Mumbai

# सायन-धारावी पुलासाठी दोन घरांवर कारवाई

**धारावी : पुढारी वृत्तसेवा**

धारावी - सायन उड्डाणपुलाच्या कामात अडसर ठरणाऱ्या बांधकामावर संबंधित प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला. सोमवारी सकाळी उड्डाणपुलालगत रेल्वे प्रशासनाच्या हद्दीत असलेल्या दोन पक्क्या घरांवर मनपा जी उत्तर विभागाने कारवाईचा बुलडोजर फिरवून कामाचा श्रीगणेशा केला.

प्रशासनाच्या धडक कारवाईमुळे उड्डाणपुलालगत राहणाऱ्या रहिवाशांत चिंतेची लाट पसरली आहे. या कारवाईमुळे येणाऱ्या काही दिवसांत उड्डाणपुलालगतच्या एका शाळेच्या वाढीव बांधकामासह मच्छी मार्केटच्या ५५ गाळ्यांवर कारवाई होण्याची शक्यता बळावल्याने मच्छी विक्रेते गाळेधारकांची डोकेदुखी वाढल्याचे दिसत आहे.

धारावी-सायन उड्डाणपुलाच्या संरक्षक भिंतीपासून काही फुटांवर ही पक्की घरे बऱ्याच वर्षांपासून उभी होती. मात्र निर्माणाधीन उड्डाण पुलाच्या आराखड्यात या जागेत उड्डाणपुलाचा जिना येत असल्याने या घरांवर कारवाई करण्यात येत असल्याचे मनपा अधिकाऱ्याने



सांगितले. येत्या दोन चार दिवसांत लक्ष्मीबाग मच्छीमार्केटमधील पात्र गाळेधारकांनी आपल्या पुनर्वसनाबाबत लवकरच निर्णय घेऊन पर्यायी जागा मनपाला दाखवावी. अन्यथा मनपाची कारवाई मात्र अटळ असल्याची चर्चा बाजारात रंगली आहे.

The Municipal Northern Division demolished two houses near the Dharavi-Sion flyover, sparking concern among residents and vendors. The demolition is part of the flyover construction, which has raised concerns about increased disruptions. Fishermen at Lakshmibagh are urged to decide on rehabilitation within days to avoid further municipal action.